महाराष्ट्र शासन
(गृह विभाग)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांचे कार्यालय
कल्याण प.-४२१३०१
Email ID: cp.thane.dcpzone3@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्र:०२५१/२३१३४१३

दि.२२/०५/२०२६

प्रेस नोट

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, कल्याण अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकाने एकुण ९ किलो ७६८ ग्रॅम वजनाचा ३४ कोटी १८ लाख ८४ हजार रुपये किंमतीचा ''हेरॉईन (गर्द)'' अंमली पदार्थ जप्त करून मुख्य पुरवठादार आरोपीसह पाच आरोपी केले जेरबंद

दिनांक ०१/०४/२०२६ रोजी पोलीस उप आयुक्त परि. ०३, कल्याण यांचे आदेशान्वये अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकातील सपोनि/अनिल गायकवाड, ग्रेड पोलीस उप निरीक्षक/जितेंद्र ठोके, पो.हवा./३०९० देवरे,पो.शि/७६५३ राहुल शिंदे,पो.शि./२३२३ अमित शिंदे,पोशि/२७६३ बिरपन, पोशि/२२२५४ खांडेकर व पो.शि/२९६४ खरसाण असे महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीर अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे,डिलर व अभिलेखावरील पाहिजे/फरारी आरोपीतांचा शोध घेवुन त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे अनुषंगाने गस्ती करीता रवाना झाले होते.

गस्ती दरम्यान वरील पोलीस पथक असे दि.०१/०४/२०२६ रोजी सकाळी ७:२० वा. चे सुमारास स्मशान भुमीजवळ,सांगळेवाडी कडे जाणारे रोडवर,कल्याण प. या ठिकाणी आले असता पथकास सार्वजनिक रोडचे कडेला दोन इसम संशयितरित्या आढळुन आले. त्यांचे पाठीवर दोन बॅग आढळुन आल्याने पथकाचा त्यांचेवर संशय बळावला. म्हणुन सदर दोन्ही इसमांकडे विचारपुस करण्याचे उद्देशाने त्यांचेजवळ जात असताना ते पळुन जाण्याचा प्रयत्न करू लागले म्हणुन त्यांना पळुन जाण्यास वाव न देता त्यांना जागीच दिनांक ०१/०४/२०२६ रोजी ताब्यात घेतले. सदर इसमांची नावे व पत्ता खालील प्रमाणे आहे.

१) कासिम अब्दुल सत्तार वसईकर, वय ३८ वर्षे, राह. बजाज हाऊस, रूम नं २०१, सावरकर नगर, सरकारी हॉस्पीटलच्या मागे, गेसरे रोड, शहापुर, जि ठाणे
२) कृष्णा नागप्पा हळेमणी वय ३६ वर्षे राह. प्रतीक्षा नगर १, सरदार नगर १, पोस्ट ऑफिस नं. २, संतोष बारचे जवळ, गुरूतेग बहादुर नगर, सायन कोळीवाडा, मुंबई

सदर इसमांची पंचांसमक्ष अंगझडती घेता त्यात खालीलप्रमाणे वर्णनाचा मुद्देमाल मिळुन आला.

१	३२,३२,६०,०००/- रू.	किंमतीचा ९ किलो २३६ ग्रॅम वजनाचा ''हेरॉईन'' हा अंमली पदार्थ ताब्यात मिळुन आलेली.
२	३९,०००/-रू.	रोख रक्कम
एकुण रु.३२,३२,९९,०००/-		

येणेप्रमाणे वर्णनाचा व किंमतीचा मुद्देमाल पंचनाम्यांतर्गत जप्त करून सदर इसमांविरूध्द पथकातील पो.शि./अमित शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ॥ २२२/२०२६ गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (एन. डी.पी.एस) १९८५ चे कलम ८(क), २२(क), २९ प्रमाणे दिनांक ०१/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे सदर गुन्हयाचे पुढील तपासात आरोपी नामे कासिम अब्दुल सत्तार वसईकर, वय ३८ वर्षे, राह बजाज हाऊस, रूम नं २०१, सावरकर नगर, सरकारी हॉस्पीटलच्या मागे, गेसरे रोड, शहापुर, जि ठाणे याचे घरझडती मध्ये ५३१.६९ ग्रॅम वजनाचा रू.०१,८५,८५,०००/- किंमतीचा **''हेरॉईन''** हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला.

तसेच गुन्हयाचे सखोल तपासा दरम्यान जप्त करण्यात आलेला ''हेरॉईन'' हा अंमली पदार्थ **मुख्य पुरवठादार अमजद युसुफ पठाण** वय ४७ वर्षे, राहणार. रुम क्रमांक. ०४, याकुब मंजिल, अल्ला हू अकबर मस्जिदच्या जवळ, जेठा कंपाऊंड, बैलबाजार, कल्याण, सध्या राहणार. रु.क्र.२३ जोगेश्वरी बिल्डींग क्र.०२,अश्विन हॉटेलच्या बाजुला, ईगतपुरी, जि. नाशिक याने आरोपी नामे गणेशन पुथुस्वामी जंगमार उर्फ अण्णा राह. रूम नं ३१७, प्रतिक्षा नगर १, सरदारनगर १, सायन कोळीवाडा, मुंबई यास व्यवसायकामी देणेकरीता उपलब्ध केला. त्याचप्रमाणे अटक आरोपी कासिम अब्दुल सत्तार वसईकर व त्याचा साथीदार सद्दाम गफुर शेख हे दोघे मिळुन अंमली पदार्थ पुरवठादार अमजद युसुफ पठाण याचा अंमलीपदार्थ व्यवसायिकांपर्यत पाहोचविण्याचे काम करत असल्याचे निष्पन्न झाले.

सदर पाहिजे आरोपीतांचा शोध घेत असताना आरोपी नामे गणेशन पुथुस्वामी जंगमार उर्फ अण्णा, राह. रूम नं ३१७, प्रतिक्षा नगर १,सरदारनगर १,सायन कोळीवाडा, मुंबई यास आरोपी क्र. ३ यास दिनांक ५/४/२०२६ रोजी व आरोपी नामे सद्दाम गफुर शेख वय ३२ वर्षे राह. रूम नं. ४५, बैल बाजार गुलशन नगर, गुजराथी स्कुल मागे, कल्याण प. जि ठाणे यास दिनांक ६/४/२०२६ रोजी अटक करण्यात आली. तसेच नमुद गुन्हयातील मुख्य आरोपी अमजद युसुफ पठाण यास दि. २१/५/२०२६ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे व दि.०१/०६/२०२६ रोजी पर्यंत १० दिवस पोलीस कस्टडी मिळाली आहे.

<u>गुन्हयात अटक एकुण ०५ आरोपी.</u>

१) कासिम अब्दुल सत्तार वसईकर, वय ३८ वर्षे, राह. बजाज हाऊस, रूम नं २०१, सावरकर नगर, सरकारी हॉस्पीटलच्या मागे, गेसरे रोड, शहापुर, जि ठाणे
२) कृष्णा नागप्पा हळेमणी वय ३६ वर्षे राह. प्रतीक्षा नगर १, सरदार नगर १, पोस्ट ऑफिस नं. २, संतोष बारचे जवळ, गुरूतेग बहादुर नगर, सायन कोळीवाडा, मुंबई
३) अमजद युसुफ पठाण वय ४७ वर्षे, राहणार. रुम क्रमांक. ०४, याकुब मंजिल, अल्ला हू अकबर मस्जिदच्या जवळ, जेठा कंपाऊंड, बैलबाजार, कल्याण, सध्या राहणार. रु.क्र.२३ जोगेश्वरी बिल्डींग क्र.०२,अश्विन हॉटेलच्या बाजुला, ईगतपुरी, जि. नाशिक
४) गणेशन पुथुस्वामी जंगमार उर्फ अण्णा वय ७१ वर्षे, राह. रूम नं ३१७, प्रतिक्षा नगर १, सरदारनगर १, सायन कोळीवाडा, मुंबई
५) सद्दाम गफुर शेख वय ३२ वर्षे राह. रूम नं. ४५, बैल बाजार गुलशन नगर, गुजराथी स्कुल मागे, कल्याण प. जि ठाणे

गुन्हे अभिलेख.

१) अमजद युसुफ पठाण वय ४७ वर्षे, रा.याकुब मंजिल,जेठा कंपाऊंड, बैलबाजार, कल्याण, सध्या रा. रु.क्र.२३ जोगेश्वरी बिल्डींग क्र.०२, ईगतपुरी, जि. नाशिक

क्र.	पोलीस ठाणे	गुन्हे
१	महात्मा फुले चौक पो.स्टे	२५०/९८ IPC १४३,१४७,१४८,४०७ RW MP ACT ३७(१),१३५
२	महात्मा फुले चौक पो.स्टे	८८/०२ IPC ३४२,३४
३	महात्मा फुले चौक पो.स्टे	८६/०४ NDPS ACT SEC ८(क), २१,२२
४	महात्मा फुले चौक पो.स्टे	७५/०३ – IPC ३९४,३४
५	महात्मा फुले चौक पो.स्टे	३७७/२० IPC ३०२,५०६(२),rw arm act ३,२५ **MCOCA 3(1)(ii),3(2)3(4)**
६	महात्मा फुले चौक पो.स्टे	७१२/२४ NDPS ACT ८(क), २०(ब), २९
७	बाजारपेठ पो स्टे	१४६/९५ IPC ४५७, ३८०
८	बाजारपेठ पो स्टे	६५/१२ IPC ३०२, २०१, ३४
९	बाजारपेठ पो स्टे	११७/१२ IPC 3०२, ५०४, ५०६, ३४
१०	मध्यवर्ती पो स्टे	२२/९६ IPC ३९४,३९७,३४१,३४
११	शीळ डायघर पो स्टे	४६/११ IPC ३९२,४११,३४
१२	CID मुंबई	७१/१२ IPC ३९९,४०२,४६५,४६६,४७१,४२०
१३	नार्कोटिक्स सेल मुंबई	३७७/०९ NDPS ACT ८(क), २०,२९
१४	नार्कोटिक्स सेल मुंबई	४०४/०९ NDPS ACT ८(क), २०,२९
१५	नार्कोटिक्स सेल मुंबई	३६९/०९ NDPS ACT ८(क), २०,२९
१६	नार्कोटिक्स सेल मुंबई	४१४/०९ NDPS ACT ८(क), २०,२९
१७	प्रतापगढ पो स्टे राजस्थान	३३२/०५ NDPS ACT ८,१८,२८,२९,२०
१८	कोतवाडी पो स्टे MP	५५२/०६ IPC ३०७,३४ RW ARM ACT २५,२७
१९	पीपरिया पो स्टे MP	१६४/०६ IPC ३०२,३४१,५०६ ARM ACT २५,२७
२०	कोनगांव पो.स्टे भिंवडी	४२७/२५ NDPS ACT ८(क),२२(क),२९ BNS 238, **MCOCA 3(1)(ii),3(2)3(4)**

२)कासिम अब्दुल सत्तार वसईकर, वय ३८ वर्षे, राह. बजाज हाऊस, रूम नं २०१, सावरकर नगर, सरकारी हॉस्पीटलच्या मागे, गेसरे रोड, शहापुर, जि ठाणे

१	म. फुले चौक पोलीस ठाणे	७२/२०१७ एन.डी.पी.एस. कायदा कलम २० प्रमाणे
२	बाजारपेठ पोलीस ठाणे	९६/२०२१ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क),२०(ब),२९
३	टिळकनगर पो.ठाणे, डोंबिवली	३२८/२०२४ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क),२१(ब)

३) सद्दाम गफुर शेख वय ३२ वर्षे रा. रूम नं. ४५, बैल बाजार गुलशन नगर,कल्याण प. जि ठाणे

१	बाजारपेठ पोलीस ठाणे	२०१/२०१८ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे
२	म. फुले चौक पोलीस ठाणे	४७५/२०१८ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे
३	म. फुले चौक पोलीस ठाणे	३३८/२०१९ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे
४	म. फुले चौक पोलीस ठाणे	३८४/२०१९ भा.द.वि.कलम ३९२ प्रमाणे
५	म. फुले चौक पोलीस ठाणे	३४०/२०१९ भा.द.वि.कलम ३७९,३४ प्रमाणे
६	म. फुले चौक पोलीस ठाणे	१०६९/२०२४ बी.एन.एस. ३०३(२),३(५) प्रमाणे
७	म. फुले चौक पोलीस ठाणे	३८१/२०२४ म.पो.का.क.३७(१),१३५ प्रमाणे

सदरची कामगिरी परिमंडळ ३ कल्याण विशेष कारवाई पथक व महात्मा फुले चौक पोलीस ठाणे यांनी संयुक्तपणे केली आहे.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त,ठाणे शहर, श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस सह आयुक्त,श्री. डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त श्री. संजय जाधव, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण,पोलीस उप आयुक्त श्री.अतुल झेंडे,सहा.पोलीस आयुक्त कल्याण विभाग अशोक होनमाणे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकातील सपोनि/अनिल गायकवाड, ग्रेड पोलीस उप निरीक्षक/जितेंद्र ठोके, पो.हवा./३०९० देवरे,पो.शि/७६५३ राहुल शिंदे,पो.शि./२३२३ अमित शिंदे,पोशि/२७६३ बिरपन, पोशि/२२२५४ खांडेकर व पो.शि/२९६४ खरसाण यांनी सदरची उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.